## दिनांक ०३.०४.२०१० रोजी संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखाली दि. ०३.०४.२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे व उपस्थितांचे स्वागत करून मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेस सुरूवात केली. व सर्वप्रथम अकोला जिल्हातील औद्योगिक विकासाबाबत सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

**अ - मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**ब - दिनांक १८-०१-१० रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे सभेचे इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आलेले आहे.**

### प्रलंबीत मुद्दे.

**कार्यवाही - १. ट्रासपोर्ट नगर.**

**मऔविमं.**

ट्रान्सपोर्टनगर करीता ६५ हेक्टर जागा राखीव ठेवण्यांत आली असून, २१ हेक्टर जागेवर मुलभुत सुविधा जसे पक्के रस्ते, स्ट्रिट लाईट, पाणि पुरवठा इत्यादी सोई उपलब्ध करून देण्यांत आलेल्या असून देखील मागील सात आठ वर्षापूसन टान्सपोर्ट नगर कार्यान्वित झाले नाही. तसेच सर्व सुविधा असून सुध्दा ट्रान्सपोटर ट्रान्सपोर्टनगर मध्ये जाण्यास तयार नाहीत. करीता ट्रान्सपोर्टनगर मधील जागा नवीन उद्योगांकरीता उपलब्ध करून देण्याबाबत औद्योगिक संधटनेने सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी ट्रान्सपोटर ट्रान्सपोर्टनगर मध्ये जाण्यास उत्सुक नसल्याने उर्वरीत ४४ हेक्टर जागा उद्योगाकरीता देण्याचा प्रस्ताव म.औ. वि. महामंडळाचे मुख्यालयाकडे पाठविण्याच्या सुचना केल्या.

**कार्यवाही -२. मऔविमं. क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठयातील अनियमीतता व नियोजनाबाबत-**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा नियमीत होत नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली सध्या १८०० घनमिटर ऐवजी १००० घनमिटर पणी पुरवठा होत आहे. तसेच जून पर्यंत हा पाणी पुरवठा अत्यल्पच होईल असेही सभेत सांगण्यांत आले होते. तसेच कायमस्वरूपी पाणी पुरवठयाबाबत रू. ४२ कोटींचा प्रस्ताव मऔविमं. यांनी मुख्यालयास पाठविण्यांत आला होता. सदर प्रस्ताव मुख्यालयाकडून नामंजुर करण्यांत आला. असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. तसेच M.I.D.C ला कुंभारी तलावापासून पाणी पुरवठा करण्याकरीता रू ३.१५ करोड चा प्रस्ताव नव्याने मुख्यालयास पाठविला आहे, असेही सांगितले मा. अध्यक्षांनी अकोला जिल्हयात तीव्र पाणी टंचाई असल्याने पिण्याचे पाण्याला प्राधान्य देण्यांत येत आहे. तसेच उद्योजकांच्या मागणी नुसार विशेष बाब म्हणून M.I.D.C तीलउद्योजकांना बोअरवेलची परवानगी दयावी तसेच water conservation च्या चेक डॅम सारख्या योंजना राबविण्याचे प्रयत्न करावे असे सुचविले. तसेच MIDC चे वरीष्ठ अधिकारी सभेला उपस्थित नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

**विषय बंद.**

**कार्यवाही -३. ग्रोथ सेंटर ते शिवाी -शिवापुर गुडस् शेड मधील अप्रोच रोडबाबत-**
**मऔविमं.**

ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवापुर शेड मधील अप्रोच रोड बनविण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून ४ महिण्यापुर्वी मऔविमं., नियोजन विभाग, मुंबई यांना सादर करण्यात आला होता, त्यास मंजुरी मिळालेली आहे.असे संबधित अधिका-यांनी सांगितले मा.अध्यक्षांनी हया ॲप्रोच रोड करीता अतिरिक्त जागा अधिग्रहीत करण्याची आवश्यकता नाही हया बाबत सविस्तर प्रस्ताव S.D.O अकोला यांनी दिलेला आहे.तसेच हया ॲप्रोच रोड करीता १२ मीटर चा रस्ता आधिच तेथे आहे. कार्यवाही त्वरीत करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

**कार्यवाही -४. आकोट औद्योगिक संघटनेने एमआयडीसी आकोट येथील विविध समस्या-**
**मऔविमं.**

एमआयडीसी अंतर्गत रस्ते दुरूस्ती काम पूर्ण झाले असून, ही आकोट अकोला मुख्य रस्ता एमआयडीसीला जोडणारा असू त्याच्या दोही बाजूला मुरूम टाकण्यात आले आहे. तसेच एमआयडीसी अंतर्गतचे 80 % पथदिवे सुरू आहे. तसेच पथदिव्यावे देखभाल व ािगा राखण्याचे काम स्थाािक कत्रांटदाराद्वारेच करण्यांत येत आहे. याबाबत च्या अडीअडचणीबाबत स्थानिक कत्रांटदाराचा पत्ता व दूरध्वनी संपर्क नं. संबंधितांना देण्यात यावा. असे मा. अध्यक्षांनी सभेस हजर मऔविमं. अधिका-यास सुचित केले. व सदर विषय बंद करण्यांस सांगीतले. **विषय बंद.**

**कार्यवाही -५. ग्रोथसेंटर मध्ये 11 K.V. व एमआयडीसी मध्ये 33 K.V.व नेटवर्क करण्याबाबत.**
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

मऔविमं. अकोला हयांचें कडनू जागेबाबत ऑफर लेटर प्राप्त झालेले असून कोटेशन सुध्दा प्राप्त झालेले आहे. हयाबाबत सब-डिव्हीजन कडून अहवाल मागविण्यांत आलेला असून, हयाकरीता आवश्यक आर्थिक तरतूर लवकरच करण्यांत येईल. तसेच लिकेंज बाबत सुचना प्राप्त झाला की कार्यवाही करण्यांत येईल असे मराविविकं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. लिंकेजबाबत सुचना प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यांत यावी असे मा. अध्यक्षंनी संबंधितांना सुचना दिल्या.

**कार्यवाही - ६. एमआयडीसी क्षेत्रात कामय स्वरूपी पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत-**
**पोलीस विभाग**

अकोला एमआयडीसी क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण, मारहाण व प्राणघातक हल्ले होत आहेत . तेथे पोलीस चौकी आहे.परंतु सुरू नाही व पोलीस पेटोलिंग सुध्दा करीत नाही असे सभेत सांगितले त्याचप्रमाणे अनुचित प्रकार झाल्यास पोलीस F.I.R दाखल करीत नाहीत तसेच तपासणी करीत नाहीत असे सभेत सांगितले. यावर मा.अध्यक्षांनी सदर विषय अनेक सभेपासून विषय सूचीवर आहे. परंतु अंमलबजावणी होत नसल्याने नाराजी व्यक्त केली व पोलीस विभागास याबाबत गांभीर्याने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

**कार्यवाही -७. मलकापुर रोड ते रेल्वे अंडर बायपास MIDC-II मधील अप्रोच रोडबाबत-**
**मऔविमं.**

मलकापुर रोड ते रेल्वे लाईन अंडर ग्राउंड रोड **MIDC-II** पर्यंत व्हावा यामुळे शहरातील नागरीकांना व एम.आय.डी.सी मध्ये काम करणा-या कामगारांना जवळचा ॲप्रोच रोड उपलब्ध होईल व येण्याजाण्याचे अंतर कमी होईल असे औद्योगिक संघटनांकडून सांगण्यात आले. सदर रोड एमआयडीसी हद्दीतून जातो व २०० मीटरचा रोड एमआयडीसी हद्दीचे बाहेरून जातो. याबाबत मा.अध्यक्षांनी सभेला उपस्थित जिल्हा परिषद अधिकारी व एमआयडीसी यांनी त्वरीत पडताळणी करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

**कार्यवाही -८. ग्रोथ सेंटर ते शिवनीगांव रोड रंदीकरण व अतिक्रमण हटविण्याबाबत-**

गोथ सेंटर ते शिवनीगांव रोड दुरूस्त व रूंदीकरण करण्याबाबत तसेच रोडच्या आजूबाजूस असलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत सभेत चर्चा झाली व सदर विषय बंद करण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले. **विषय बंद**.

**कार्यवाही -९. MIDC क्षेत्रातील पथदिवे बंद असल्याबाबत- मऔविमं.**
**मऔविमं.**

अकोला औद्योगिक क्षेत्रातील पथदिवे सद्यस्थित २५ टक्के सुरू आहेत. त्यामुळे या क्षेत्रात चोरीचे प्रमाण वाढलेले आहे. अशी चर्चा झाली हया कामाकरीता कंत्राटदार नेमण्याची प्रक्रीया सुरू असल्याचे एम.आय.डी.सी ने सभेत सांगितले याबाबत एम महिन्याचे आत कार्यवाही करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या

**कार्यवाही -१०. नॅशनल टीन सप्लायर प्लॉट नं. F-४४ MIDC-II दुर्गध करीत असल्याबाबत-**
**मऔविमं**/MPCB

एमआयडीसी-२ येथील में. नॅशनल टीन सप्लायर प्लॉट नं. F-44 MIDC-II हा प्लॉट भाडयाने दिलेला असून तेथे जुने तेलाचे डबे दुरूस्त करण्याचे काम होत आहे. तेथे भटट्री लावून जुने तेलाचे टिनाचे डबे दुरूस्त करण्याचे काम होते त्यामुळे या परिसरात प्रदुषण होते. व दुर्गधी सुध्दा पसरते याबाबत महाराष्ट प्रदुषण नियत्रण मंडळाने १७/०२/१० ला नोटीस दिली असून वैयक्तीक सुनावणी असल्याचे व दोषी आढळल्यास घटकावर कार्यवाही करण्यांत येईल असे सभेत सांगितले.मा. अध्यक्षांनी पुढील सभेपर्यन्त कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

**कार्यवाही -११. व्यवसायीन दृष्टया प्रवासी हवाई सेवा विकास-**
**मऔविमं.**

अकोला येथील शिवनी येथे **Airport** तयार करण्यांत आले असून, जवळपास त्याचे पूर्णत्वाचे काम पूर्ण होत आलेले आहे. परंतू त्यावरील धावपटट्री ही १.४ मीटर असून त्यावरून प्रवासी सेवा होवू शकत नाही करीता सदर धावपटट्री वाढवून ती १.४ मीटर वरून २.२ करण्यांत यावी. जेणे करून अकोला येथील व्यापारी व प्रवासी नागरीकांना साईचे होईल. अशी मागणी विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री या औद्योगिक संघटनेने केली. यावर मा. अध्यक्षांनी सांगीतले की, हयाबाबत मंत्रालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरू असून, मंत्रालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

**कार्यवाही -१२. VAT कायदया बाबत-**
**विक्रीकर विभाग.**

अकोला औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांना **VAT Tax Refund** करीता दिनांक ३१ मार्च २००९ रोजी रिटर्न भरून चलानद्वारे जमा करतात त्यांना मागील वर्षाचा परतावा मिळण्यापुर्वी नवीन वर्षाचा **VAT Tax** भरावा लागतो. तरी ही विसंगती दूर करण्यासाठी कार्यवाही करण्यांबाबत औद्योगिक संघटनेने कळविले असून, ऑडीट केल्यानंतर रिफंड देण्यांत येईल. असे विक्रीकर विभाग अधिका-यांनी मागील सभेत सांगितले.विक्रीकर विभाग अधिकारी यांना सभेस बोलावून सुध्दा ते सभेस हजर न झाल्यामुळे चर्चा होवू शकली नाही.

**कार्यवाही -१३. प्लॉट क्र. पी-३, MIDC ताबा मिळण्याबाबत -**
**मऔविमं.**

हयाबाबत विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स & इंडस्ट्री यांनी MIDC येथील प्लॉट क्र. पी-३, चा ताबा देण्यांबाबत सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी MIDC अधिका-यांशी केली व प्लॉट वाटप बाबत झालेली अनियमीतता नियमीत करून पुढील सभेपुर्वी संबंधितास प्लॉटचा ताबा देण्याच्या सुचना सहायक क्षेत्राीय व्यवस्थापक, MIDC अकोला हयांना दिल्या होत्या. तांत्रीक अडचण असल्याने सदर प्लॉट घटकास देता येणार नाही. असे सभेस हजर सहायक क्षेत्राीय व्यवस्थापक, MIDC अकोला सभेस सभेत सांगीतले. **विषय बंद**.

## नवीन मुद्दे

**कार्यवाही -१. अतिरिक्त विभागीय कार्यालय अकोला येथे कार्यरत करण्याबाबत-**
**मऔविमं.**

एमआयडीसीचे विभागीय कार्यालय अमरावती येथे आहे. हया कार्यालयात जवळ-जवळ ६० ते ७० टक्के कामकाज हे अकोला जिहयाचेच असते. प्रत्येक लहान-लहान कामाकरीता उद्योजकांना विभागीय कार्यालय अमरावती येथे सतत फे-या कराव्या लागतात. त्यामुळे प्रत्येक कामाला वेळ लागतो. करीता एमआयडीसीचे विभागीय कार्यालय अकोला येथे कार्यरत करण्यांत यावे. जेणे करून अकोला येथील काम लवकर होतील शिवाय वाशिम व बुलढाणा जिल्हयातील उद्योजकांना सुध्दा सोईचे होईल. हयाबाबत अकोला इंडस्ट्रीज असो. हयांनी मागणी केली आहे. यावर एमआयडीसीने तसा प्रस्ताव तयार करून मुख्यालयास पाठविण्याच्या मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या.

**कार्यवाही -२. अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसींग सोसायटी कम शॉपींग कॉम्लेक्स**
**मनपा. सोसायटीच्या विकासाच्या कामास सुरवात करण्यांबाबत व ट्रान्झीट पास बाबत-**

हयाबाबत अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसींग सोसायटी कम शॉपींग कॉम्लेक्स सोसायटी लि. अकोला हयांनी मा. आयुक्त अकोला महानगर पालीका, अकोला हयांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदन हि दिले. अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसींग सोसायटी कम शॉपींग कॉम्लेक्स संकुलातील विकासाची कामे त्वरीत पुर्णत्वास नेण्याकरीता सुरवात करावी त्यामध्ये प्रामुख्याने पथदिवे व रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसींग सोसायटी कम शॉपींग कॉम्लेक्स हयांनी मागणी केली यावर मनपा अधिका-यांनी सांगीतले की, ७० ते ८० % कर भरल्यास संकुलातील कामे करता येईल. यावर मा. अध्यक्षंनी कर भरण्याच्या संबंधितांना सुचना दिल्या.

**-स्वाक्षरीत-**

| | |
|---|---|
| मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, | महाव्यस्थापक तथा सदस्य सचिव |
| जिल्हा उद्योग मित्र समिती सभा. | जिल्हा उद्योग मित्र समिती सभा. |

**स्थानिक लोकांना रोजगार : -**

औद्योगिक विकासातून जिल्हयातील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा या दृष्टी कोणातून स्थानिक लोकांना नोक-यामध्ये प्राधान्य देण्यांचे शासनाचे धोरण असून सर्व उद्योग घटकांनी पर्यवेशीय क्षेणाीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षीय सहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के कर्मचारी नियुक्त करण्यांबाबात शासन निर्णयाद्वारे कळविण्यांत आलेले आहे. तरी हयाबाबत सर्व उद्योजकाना औद्योगिक संघटनेद्वारे कळविण्यांत यावे.

औद्योगिक घटकांकडून स्थानिक लोकांना रोजगार बाबत प्रपत्र १ मध्ये प्राप्त झालेल्या घटकांची माहिती खालील प्रमाणे

| **ELP Annual Returns** | Census List | MSME List |
|---|---|---|
| **No. of working Units** | 631 | 230 |
| **ELP Figure collected** | 339 | 51 |
| **Superwisory Total ELP** | 605 | 85 |
| **Superwisory Local ELP** | 591 | 84 |
| **%** | 97.70 | 98.80 |
| **Non Superwisory Total ELP** | 2879 | 393 |
| **Non Superwisory Local ELP** | 2771 | 393 |
| **%** | 96.25 | 100 |
| **Total ELP** | 3481 | 478 |
| **Total Local ELP** | 3362 | 477 |
| **%** | 96.60 | 99.80 |

हयाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली असून, माहे जून २०१० अखेर पर्यंत सर्व उद्योग घटकांनी प्रपत्र १ जिल्हा उद्योग केंद्र, कार्यालयाकडे सादर करण्याच्या मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या.